Page: ३

॥ श्री ॥

- ज्ञानेश्वरीतील कर्मयोग -

स्वधर्मु जो बापा । तोचि नित्ययज्ञ जाण पां ।
म्हणोनि वर्तता तेथ पापा । संचारु नाही ॥

असे अभिवचन ज्या अध्यायात भगवंत अर्जुनाला देतात तो हा कर्मयोग! खरं तर अर्जुनाच्या निमित्ताने अखिल मानवजातीला आचरणाचा जणू मूलमंत्रच भगवान देत आहेत. खरेखर, गीता-ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथांचे नित्य पठण व त्यानुसार निष्ठेने आचरण ठेवले तर प्रत्येक मनुष्य उद्धरून जाईल हा विश्वास यानिमित्ताने जागवायचा आहे. आणखी एक महत्त्वाचा आणि मूलभूत सिद्धांत यात मांडला आहे की कोणीही व्यक्ती कर्म केल्याशिवाय क्षणभरदेखील राहू शकत नाही. परंतु पुष्कळ कर्मे करणारा काही कर्मयोगी होऊ शकत नाही. मग त्याचि कर्माला जर योग्य वळण लावले, प्रत्येक कर्म शास्त्रविधिनुसार करण्याची सवय लावून घेतली तर त्यातून प्रत्यक्ष परमेश्वराची प्राप्ति होऊ शकते. म्हणजेच कर्माच्या या साध्याशा वाटणाऱ्या नौकेतून हा भवसागर तरून जाता येईल. मात्र त्यासाठी प्रत्येक कर्म विशिष्ट कसोट्यांवर तपासून घेतले तर कर्माचा कर्मयोग होईल.

ही सहज, सोपी युक्ती प्रजापतिने सृष्टि उत्पत्ति करतानाच सांगितली आहे. प्रत्येक कर्म हे यज्ञकर्मच व्हायला हवे,

तैसा स्वधर्मरूपी मखु । हाचि सेव्यु तुम्हा एकु ।
ऐसे सत्यलोकनायकु । म्हणता जहाला ॥
देखा स्वधर्माते भजाल । तरी कामधेनु हा होईल ।
मग प्रजाहो न संडील । तुमते सदा ॥

स्वधर्म हा कामधेनुप्रमाणे फळणारा आहे. केवळ स्वधर्मानुसार वागणे झाले तरी बाकी व्रत-नियम, जप-जाप्य, देहपीडा, ग्रंथपठण काहीही करायला नको. तुम्ही देवतांना संतुष्ट ठेवले तर देवता तुम्हाला निश्चित संतुष्ट राखतील याची खात्री बाळगा.

तुम्ही देवतांते भजाल । देव तुम्हाला तुष्टतील ।
ऐसी परस्परे घडेल । प्रीति जेथ ॥

मात्र जो स्वधर्माप्रमाणे आचरण ठेवणार नाही, देवतांना

त्यांचे त्यांचे भोग न देता स्वत: ओरबडून घेईल त्याला मात्र भगवंत चोर म्हणतात. हे भगवंतांचे परखड वचन ऐकून सामान्य मनुष्य गडबडतो, ओशाळतो, त्याला वाईट वाटते, क्वचित रागही येतो परंतु भगवंतांचे हे बोलणे योग्यच आहे. अगदी मोठमोठे जड शब्द न वापरता साध्या भाषेत सांगायचे झाले तरी सृष्टिचा नियम पाळायलाच हवा. ही सृष्टि, हा निसर्ग म्हणजेच या देवता, पंचमहाभूते आपल्याला भरभरून देत असतात. अगदी नकळत्या वयापासून आपण या प्रकृतिकडून मनसोक्त घेत आलो आहोत. किती खाल्ले, प्यायले, ल्यायले याला तर सीमाच नाही. ते सर्व काही आपण परत करू शकणार नाही. हे खरे असले तरी आपण केवळ घेणारेच व्हायचे का? देणारा हात होता येणारच नाही का? आणि अगदी प्रत्यक्ष देता आले नाही तरी निदान कृतज्ञता तरी व्यक्त करणे तरी शक्य आहे ना? किमान एवढे तरी साधण्यासाठी प्रत्येक कर्म हे यज्ञकर्मच ठरायला हवे. आणि भोग घ्यायचा झाला तरी तो यज्ञाचा प्रसाद म्हणून घ्यायला. केवळ एवढ्यानेच त्या उपभोगापासून पाप लागणार नाही आणि अर्थातच कर्माचे बंधन पडणार नाही. जन्ममृत्युच्या बंधनात जीव पुन्हःपुन्हा सापडतो ते कर्मामुळेच व त्यातील वासनेमुळेच! परंतु वासनारहित, निष्काम भावनेने, यज्ञप्रसाद समजून जर कर्म करत गेलो तर प्रत्येक कर्म निर्मळ, बंधनरहित होत जाईल. अगदी जवळ असणारा पैसा देखील यज्ञातील आहुती मानायला हवी.

जे संपत्तिजात आघवे । हे हवनद्रव्य मानावे ॥

असे वर्तन असेल तर रोजचे अन्नसेवन देखील उदर-भरण न राहता यज्ञकर्मच होऊन जाते. त्यातून आपोआपच या अन्नसाखळीमध्ये जे घटक सहाय्यभूत ठरतात, त्यांच्याविषयी अंत:करणात कृतज्ञता दाटून येते. साहजिकच त्यांचा गैरवापर टाळला जातो. या सृष्टितील प्रत्येक पदार्थ ही ईश्वराची निर्मिती आहे. मी देखील त्या परमेश्वराचाच अंश आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखून या सृष्टिचक्राला बाधा न आणता वावरायचे आहे. तरच मनुष्यजन्माचे सार्थक होईल.

हे चक्र म्हणजे सृष्टि-परंपरा! जो कोणी दुष्कृत्य करून या चक्राकार गतीत अडथळे आणतो त्याला गीता अघायु किंवा इंद्रियाराम म्हणते. तर माऊली त्यांना गावंढे वा मत्त म्हणते.

म्हणुनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूपी क्रतु ।
नानुष्ठी जो मत्तु । लोकी इये ॥

परंतु याच्या अगदी उलट, जो कोणी फलाशारहित कर्मे ईश्वरार्पण भावनेने, अहंकाररहित वृत्तीने आणि उत्तम प्रकारे करेल त्याला कैवल्यपदाचा लाभ होतो. त्यासाठी नेहमीच्या साध्याशा कर्मांचेच नैष्कर्म्य करायचे. या सिद्धांताला दाखला म्हणून भगवंत काही प्रत्यक्ष उदाहरणे देतात. आणि ती नावे ऐकूनच स्वधर्माचरण करण्यासाठी विशेष बळ प्राप्त होते. कारण मनुष्यस्वभावच असा आहे की कुणाला असा अनुभव आला आहे असे कळले की त्याविषयी श्रद्धा दृढ होते. जनकादिकांना या स्वकर्माच्या आचरणामुळेच संसिद्धिपर्यंत पोहोचता आले. अर्जुना, तूही या मार्गाने जाण्यास सक्षम आहेस असे धीराचे बोल ऐकवून भगवंत अर्जुनाला कर्म-मार्गाने जाण्यासाठी प्रवृत्त करतात. त्याच जोडीला एक सिद्धांत सुद्धा चपखलपणे सांगतात. सर्वसामान्य माणसे अनुकरणशील असतात. त्यामुळे जेव्हा नेमके काय करावे हे सुचत नाही तेव्हा थोर व्यक्तींच्या मार्गाने जावे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवावे.

एथ वडील जे जे करिती । तया नाम धर्मु ठेविती ।
तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥

आणि याहीपुढे जाऊन भगवंत आपला स्वतःचाच दाखला देताना म्हणतात, "आता माझेच पहा ना! खरे तर मला करण्यासारखे कार्यच नाही. तरी देखील मी कार्य करतोच आहे. कारण मी जर कर्माविषयी सावधानता बाळगली नाही, माझ्या कार्यात जर शैथिल्य आले तर लोकसुद्धा माझा आदर्श ठेवून आळशी होतील. सैल आचरणाचे, दुष्कृत्ये करणारे होतील."

ज्याला अगदी मनापासून समाजात सत्कर्माची बीजे रुजवायची असतील, लोकांना सन्मार्गावर ठेवायचे असेल, जनसमुदायाला उत्तम आचरणाचे धडे द्यायचे असतील त्याने

स्वतःचे आचरण चोख ठेवावे. स्वतः निरपेक्ष, निष्काम असूनही बाहेर चारचौघांसारखेच वागावे. लोकांमध्ये राहून लोकांसारखे वागले नाही तर त्याला खड्यासारखे वगळले जाते. आपल्या उत्तम व तरीही साध्या आचरणाने लोकांना आदर्श घालून द्यावा।

मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे।
अलौकिक नोहावे। लोकांप्रती॥

त्याच जोडीला सामान्यजनांच्या बुद्धीत गोंधळ निर्माण करू नये. प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असतो. त्यानुसार त्यांना बोध करावा. परंतु सर्वांना सत्कार्याला लावावे. सर्वांमुखी मंगल बोलवावे आणि हे सर्व करत असतानाच त्या सर्व कर्मांचे श्रेय भगवंताकडे द्यावे. मी केवळ माध्यम आहे याची जाण ठेवायची. सारे कर्तृत्व त्या जगदीश्वराचे आहे ही श्रद्धा अशा थोर महात्म्यांच्या मार्फत तळागाळापर्यंत झिरपत जाते. परंतु जो गर्विष्ठ, उन्मत्त असतो तो सगळ्याचे श्रेय स्वतःकडे घेतो. खरे तर हा सारा प्रकृतिचा खेळ आहे. घडवणे आणि मोडणे ही तिची लीला आहे. आपण केवळ निमित्तमात्र आहोत याची नम्र जाणिव जर मनात असेल तर अहंकाराच्या वारादेखील चित्ताला लागणार नाही. आणि मग अशा मनुष्याने कोणतेही कर्म केले तरी त्याचे बंधन त्याला पडणार नाही. निसर्गात देखील हे स्पष्टपणे दिसते.

सूर्य उगवल्याबरोबर सृष्टित चैतन्याचा संचार होतो. झाडे-वेली डोलू लागतात. पशु-पक्षी, माणसांचा दिनक्रम सुरू होतो. परंतु सूर्याला त्याचा लेशमात्र अभिमान नसतो. अभिमान तर दूरच पण त्याला त्याची जाणीवही नसते की, त्याच्यामुळे अंधार दूर झाला आहे, प्रकाशाचे साम्राज्य पसरले आहे, दुष्प्रवृत्ति हतप्रभ झाल्या आहेत. अर्जुना, तुला असा सूर्यासारखा कर्मयोगी व्हायचे आहे. सर्व करून अकर्ता, सर्व भोगूनही अभोक्ता, अशा निर्लेप वृत्तीने तू वागलास ना की तुला या घोरकर्मांचे परिणाम- -ज्याला तू पाप समजतो आहेस- ते भोगावे लागणार नाहीत. त्यांचा स्पर्शदेखील तुला होणार नाही. म्हणून तू कर्मयोगी हो, आणि तू जर असा वागलास तर तुझ्या बाजूने लढणाऱ्या अनेक

वीरांना जोम येईल. अंगात वीरश्री संचारेल. कारण पूर्णज्ञान असणाऱ्याने मंदबुद्धी अज्ञान्यांचा बुद्धिभेद करू नये. अर्जुना, सर्वसामान्य माणसे प्रकृतीच्या गुणांनी मोहित होऊन कर्मात आसक्त होतात. अशा लोकांकडून विहित कर्मे करवून घेणे हे तुझे कर्तव्यकर्म आहे, कारण ते प्रापंचिक भोगांनाच सुखदायक व श्रेष्ठ मानतात. एकदा का सर्व कर्मे ईश्वरार्पण केली की आशा, ममता, संताप यांचा नाश होतो. आसक्ती, द्वेष, हर्ष-शोक हे विकार संपतात. आणि म्हणूनच जे कोणी दोषदृष्टी टाकून श्रद्धायुक्त अंत:करणाने माझ्या या मताचे अनुसरण करतात ते सगळ्या कर्मांपासून मुक्त होतात परंतु जे लोक माझ्यावरच दोषारोप करून शास्त्रविरुद्ध वागतात अशा मूर्खांबद्दल काय बोलावे?

तैसे ते पार्था । जे विमुख या परमार्था ।
त्यासी संभाषण सर्वथा । करावेना ॥

अशा अविवेकी लोकांची देहबुद्धी प्रबळ असते. ते आत्मबुद्धीकडे वळतच नाहीत. परंतु त्यांना हे समजत नाही की पंचमहाभूतांचे बनलेले हे शरीर नश्वर आहे, परस्वाधीन आहे आणि विषयलालसा ही अध:पतनाकडे नेणारी आहे. यातून जर तुला सुटका हवी असेल तर तू स्वधर्माचा जिव्हाळा नष्ट होऊ देऊ नकोस. स्वधर्माचे पालन अगदी प्राणापलीकडे केले तर ते इहपरलोकाच्या दृष्टीने श्रेष्ठ कर्म ठरणार आहे. कधीतरी स्वधर्म उणा वाटला, अडचणीचा वाटला तरीदेखील तोच आचरावा कारण त्यातच तुझे कल्याण आहे.

अगा स्वधर्मु हा आपुला । जरी का कठिणु जाहला ।
तरी हाचि अनुष्ठिला । भला देखे ॥

अर्जुना रजोगुणातून उत्पन्न होणारे काम व क्रोध यांना तू महाभयंकर शत्रूच समज. ते ज्ञानी पुरुषांचा प्रतिज्ञापूर्वक घात करतात. यांच्यामुळे ज्ञानावर आवरण पडते. त्यांना जिंकणे अवघड असले तरी अशक्य नाही. त्यांना पराभूत करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानावर हल्ला करायचा.

कुठे आहे त्यांचे निवासस्थान? ५ कर्मेंद्रिये ५ ज्ञानेंद्रिये आणि मन-बुध्दी अशा १२ ठिकाणी यांचे वास्तव्य असते. एकदा त्यांच्या मुळावरच घाव घातला की त्यांना आटोक्यात आणणे सोपे जाते.

ज्ञानेंद्रियांची जेव्हा विषयांशी भेट होते तेव्हाच कामाची पहिली ठिणगी पडते. त्यातून मनाकडे संवेदना पोहोचवली जाते. मन त्यावर निर्णय घेऊन कर्मेंद्रियांना आदेश देते. त्याप्रमाणे कर्मेंद्रिये आचरण करतात आणि इथूनच अधःपतनाला सुरुवात होते. त्यामुळे पहिला हल्ला इंद्रियांवरच करायचा. त्यांना स्वैर वागू द्यायचे नाही. त्यांच्यावर कडक पहारा ठेवायचा. त्यांना मर्यादित भोग द्यायचे. परंतु तेवढ्याने त्यांचे भागत नाही. इंद्रिये ही फार अवखळ आहेत, बलवत्तर आहेत. परंतु त्याहीपेक्षा वरचढ मन आहे. चंचल मनाच्या ताब्यात जर इंद्रिये गेली तर घसरगुंडी निश्चित आहे. पण जर या मनावर बुध्दीचा अंकुश असेल तर बुध्दी अचूक निर्णय घेते कारण बुध्दी ही मनापेक्षा श्रेष्ठ आहे. ती मनाला आणि अर्थातच इंद्रियांना वेड्याकडे वागूच देत नाही. बुध्दिचे अनुशासन लाभले तर इंद्रिये शिस्तीत वागतात. पण जर मन बुध्दीला जुमानत नसेल तर मात्र अनीति-अधर्म योग्य वाटू लागतात.

मग मनाची धाव पारुषेल। आणि बुध्दीची सोडवण होईल।
इतुकेनि थारा मोडेल। या पापीयांचा॥
यांचा पहिला कुरुठा इंद्रिये। एथुनि प्रवृत्ति कर्माते विये।
आधी निर्दळूनि घाली तिये। सर्वथैव॥

इंद्रियांपेक्षा मन, मनापेक्षा बुध्दि श्रेष्ठ असली तरी त्या आत्मतत्त्वाच्या आधारे तू खंबीरपणे कामरूपी शत्रूला मारून टाक. आणि एकदा का हे कामक्रोध नष्ट झाले की आपसूकच ब्रह्मज्ञानाचे साम्राज्य प्राप्त झाले असे समजावे. आणि मग तो जीव आत्मानंदात रममाण होतो. तेव्हा जीवाशिवाची भेट होते.

जैसे रागद्वेष जरी निमाले। तरी ब्रह्मीचे स्वराज्य आले।
मग तो भोगी सुख आपुले। आपणाची॥

अशा प्रकारे नित्य व्यवहारातील सोप्या कर्मांच्या आधारे देखील परमेश्वराची प्राप्ती होऊ शकते हेच या कर्मयोगाच्या अभ्यासातून आपल्याला समजते. ज्ञानयोग व भक्तियोग परमेश्वरापर्यंत जाण्यासाठी सहाय्यभूत ठरतात परंतु कर्मयोग हा असा योग आहे की त्यातून कर्मांचा आनंद घेत घेत परमार्थ साधता येतो. प्रपंच आणि परमार्थ हातात हात घालून चालतात. म्हणून संसारी लोकांना आचरायला सोपा असा हा कर्मयोग आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात॥

॥ शुभं भवतु॥

फोन नं. ०२०-२५३८६९६४
९३७३३६६६११

माधवी रघुवीर जोशी
डी-९७, वुडलँड
गांधी भवन जवळ
कोथरूड, पुणे
४११ ०३८